Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000. www.unishivaji.ac.in, E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६ ००४, महाराष्ट्र
दूरध्वनी - ईपीएबीएक्स - २६०९०००, www.unishivaji.ac.in, E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१, २६०९१३५

संदर्भ: शिवाजी वि./संलग्नता/टी-२/शासन टेबल/ No 1907 दि. 30 AUG 2024

# परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक
सर्व संलग्नीत महाविद्यालये / संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय :- स्त्रीत्वाचा अपमान करणाऱ्या अपशब्दांचा अश्लाघ्य शिव्यांच्या वापरावर विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालयांमध्ये बंदी आणण्याबाबत.

संदर्भ :- प्रा.डॉ.अंबादास मोहिते संस्थापक अध्यक्ष "मास्वे" व समन्वयक "शिव्यामुक्त समाज अभियान समिती" यांचा दिनांक १४/०८/२०२४ चा ई-मेल.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय संदर्भीय पत्रास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, **प्रा.डॉ. अंबादास मोहिते संस्थापक अध्यक्ष "मास्वे" व समन्वयक "शिव्यामुक्त समाज अभियान समिती "** यांनी पाठविलेल्या पत्रानुसार महाविद्यालयांनी आपल्या स्तरावर कार्यवाही करावी व त्याचा अहवाल विद्यापीठ कार्यालयास ई -मेल व्दारे पाठवावा ही विनंती.

**कळावे.**

आपला विश्वासू,

डॉ. पी. एस. पांडव
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

सोबत - ई मेल पत्र जोडले आहे.

C:\Users\Admin\Desktop\Shashan Table (Parit Sir).docx

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

Shivaji University, Kolhapur
Affiliation/T-2
Inward No. 6179
Date 16/8/24

VC Office <vcoffice@unishivaji.ac.in>

# Re: अश्लाघ्य शिव्यांचा वापरावर विद्यापीठ व संलग्रित महाविद्यालयांमध्ये बंदी आणण्याबाबत.......

1 message

Ambadas Mohite <ambajyotimail@rediffmail.com> Wed, Aug 14, 2024 at 12:48 PM
To: vcoffice <vcoffice@unishivaji.ac.in>, registrar <registrar@unishivaji.ac.in>

Date - 14-Aug-2024
Inward No. 479
EST/Tr/D8D

मा. महोदय,
आपणा सर्वांना "स्वातंत्र्य दिनाच्या" "हार्दिक शुभेच्छा!"

स्त्रीत्वाचा अवमान करणाऱ्या अश्लील शिव्यांच्या वापरावर विद्यापीठ व संलग्रीत महाविद्यालयांच्या परिसरात बंदीबाबत महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्स ("मास्वे") तर्फे आपणास दिनांक १७ जुलै रोजी पत्र पाठविले होते. आपण त्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही नक्कीच केली असणार हा विश्वास आहे.
आपण केलेल्या कार्यवाहीची माहिती आम्हाला कळविल्यास आम्ही आपले आभारी राहू.
सहकार्याच्या अपेक्षेत,
आपला स्नेहांकित,
प्रा अंबादास ये मोहिते,
संस्थापक अध्यक्ष, "मास्वे",
संयोजक, शिव्यामुक्त समाज अभियान, महाराष्ट्र

SHIVAJI UNIVERSITY
Vice-Chancellor's Office
Date 14 AUG 2024
Inward No. 479
To Whom R/DSD.

R/DSD
14/08/2024

From: "Ambadas Mohite"<ambajyotimail@rediffmail.com>
Sent: Wed, 17 Jul 2024 13:35:13 GMT+0530
To: "vcoffice"<vcoffice@unishivaji.ac.in>,"registrar"<registrar@unishivaji.ac.in>
Subject: अश्लाघ्य शिव्यांचा वापरावर विद्यापीठ व संलग्रित महाविद्यालयांमध्ये बंदी आणण्याबाबत.......

EST/D8D/Tr

**प्रति,**
**मा. डॉ. डी. टी. शिर्के,**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर

**विषय- स्त्रीत्वाचा अपमान करणाऱ्या अपशब्दांचा, अश्लाघ्य शिव्यांचा वापरावर विद्यापीठ व संलग्रित महाविद्यालयांमध्ये बंदी आणण्याबाबत.......**

**मा. महोदय,**

**उपरोक्त विषयासंदर्भात आम्ही मोठ्या आशेने व विश्वासाने महाराष्ट्र असोशिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्स (मास्वे) व "शिव्यामुक्त समाज अभियान समिती" तर्फे आपणास हे निवेदन सविनय सादर करीत आहोत.**

महोदय, आपला देश विविविधतेने नटलेल्या अशा समृद्ध संस्कृतीची भूमी आहे. सर्वच धर्मात, संप्रदायात स्त्रियांचा आदर करण्याची मूल्य सांगितली जातात. हिंदू धर्मात तर देवी सरस्वती, लक्ष्मी, दुर्गा यांची पूजा आणि स्तुती केली जाते. छत्रपती शिवाजी महाराजांनी शत्रू पक्षातील स्त्री मध्ये सुद्धा माता पाहिली व तिला सन्मानाची वागणूक दिली हीच खरी आपली भारतीय संस्कृती आहे. एकीकडे मातृत्व दिन, रक्षाबंधन , भाऊबीज, महिला दिन साजरा केला जातो तर दुसरीकडे आई आणि बहिणींशी निगडीत स्त्रीत्वाचा अपमान करणाऱ्या अपशब्दांचा व अश्लाघ्य शिव्यांचा वापर भांडणाच्या वेळी तर सोडा इतर वेळी सुद्धा आजकाल सर्व धर्मातील व्यक्तींकडून सर्रासपणे केला जातो हि अत्यंत दुर्दै वाची व सामाजिक- नैतिक मूल्यांना पायदळी तुडविणारी बाब आहे. माता-भगिनींबद्दल अपशब्द वापरून एखाद्या व्यक्तीला मानसिक- भावनिक त्रास देण्याची , त्याचा अपमान करण्याची कृती निश्चितच विकृत मानसिकता दर्शविणारी आहे.

पुरुषत्व-मर्दानगी दाखविण्याकरिता शिवीगाळ करतांना, "बेह**द", "मा***द", "तुझ्या आईच्या ***", "रां*च्या", "भोस* च्या", "तेरी मा की**", बेहेन की **", "बु *", "बा*र्ड", असे स्त्रीत्वाचा अपमान करणारे हे अश्लील शब्द आपला समाज महिलांकडे कसा पाहतो आणि त्यांच्याशी कसा वागतो याचे द्योतक आहे. स्त्रियांच्या जननेंद्रियाचा उल्लेख करणारे हे नारीद्वेषमूलक अपशब्द एक प्रकारच्या मर्दानी धमक्या असून स्त्री व तिचे शरीर आपल्या मालकीचे आहे ही पुरुषी मानसिकता दर्शविणारे आहेत. स्त्रियांच्या खाजगी भागाचा अनादर किंवा अपमान करणारी सार्वजनिक ठिकाणी वापरली जाणारी भाषा कोणाही संवेदनशील व्यक्तीच्या कानांसाठी तर वाईट आहेच पण

महत्वाचे म्हणजे आपल्या समाजाच्या मूल्यांची ऐशी-तैशी करणारी आहे. ज्या व्यक्तीचा अपमान करायचा आहे त्याच्या आई किंवा बहिणीबद्दल वाईट शब्द वापरले जातात. त्यामुळे त्या व्यक्तीच्या प्रतिष्ठेचा अवमान होतो आणि त्या व्यक्तीमध्ये खजीलपणाची व संतापाची भावना निर्माण होते. त्याची परिणीती शिव्या देणाऱ्या व्यक्तीच्या हत्येत झाल्याची सुद्धा अनेक उदाहरणे आहेत.

सध्या ओटीटी प्लटफॉर्म वर दाखविण्यात येणाऱ्या वेब सिरीज व चित्रपटांमध्ये "बेह**द", "मा***द" अशा शिव्यांचा, अत्यंत अश्लील व हिंसक दृश्यांचा सर्रासपणे वापर निश्चितच आपल्या सामाजिक मूल्यांशी अजिबात सुसंगत नाही व समाजाकरिता भूषणावह सुद्धा नाही. त्यामुळे याला सुद्धा पायबंद घालणे आवश्यक आहे.

**भारतीय संविधान, आपली संस्कृती, स्त्रियांचा सन्मान, समाजाची शांतता आणि सुव्यवस्था, सभ्यता आणि नैतिकता , लोकसंख्येची गुणवत्ता आणि राष्ट्राचे भविष्य आदी बाबी विचारात घेता** शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, शासकीय खाजगी कार्यालये, बगीचे, क्रीडांगणे, आदी सर्व सार्वजनिक ठिकाणी अशा वर्तनाचे नियमन व प्रतिबंध करणे ही काळाची गरज आहे.

संविधानाच्या अनुच्छेद १९(२) अन्वये सार्वजनिक सुव्यवस्था व शालीनता, सभ्यता आणि नैतिकतेच्या हिताकरिता भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य प्रतिबंधित करण्याचा अधिकार सरकारला आहे. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ५१ क (भाग चार –क राज्य नीतीची मार्गदर्शक तत्त्वे) नुसार स्त्रीच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे हे प्रत्येक नागरिकाचे ( व शासनाचे देखील) मूलभूत कर्तव्य आहे. राज्य नीतीची मार्गदर्शक तत्त्वे कायद्याने बंधनकारक नसल्यामुळे लोक मूलभूत कर्तव्याकडे दुर्लक्ष करतात आणि त्याचे पालन करीत नाहीत.

त्यामुळे अश्लील शिव्यांचा वापर करून स्त्रीत्वाचा अपमान करणाऱ्या, स्त्रियांच्या व पुरुषांच्या सुद्धा प्रतिष्ठेला धक्का पोहोचवणाऱ्या शिव्यांना आळा घालण्याकरता व्यापक प्रमाणावर विशेषतः **विद्यार्थी व युवा वर्गात** जागृती / प्रबोधन करण्याची नितांत गरज आहे.

**आई-बहिणींच्या नावाने शिव्या काही फारशी गंभीर बाब नाही असे धोरण स्वीकारून अशा अनैतिक बाबींना स्वीकार्य रूढी बनू दिल्यास भविष्यात भारतीय समाजाच्या सांस्कृतिक मूल्यांची किंमत आपल्याला मोजावी लागेल व समाज अधोगतीकडे जाईल हे नक्की.**

आपल्या समाजाला एक सुसंस्कृत, अभिरूची संपन्न समाज बनविण्यासाठी, संविधानाच्या तरतुदींच्या सन्मानासाठी , लिंगाधारित समानतेसाठी व संस्कृतीच्या संरक्षणासाठी आता या अपशब्दांना/अशा शिव्यांना हद्दपार करावे लागेल व त्याकरिता आपल्या विद्यापीठाने पुढाकार घ्यावा अशी आमची अपेक्षा आहे.

**महिलांचा सन्मान करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्याचं यंदा ३५० वं वर्ष आणि महिलांच्या विकास व संरक्षण याकरिता विविध कायदे करणारे शाहू महाराज यांच्या जयंतीचे १५० वे वर्ष. त्याचे औचित्य साधून आपल्या विद्यापीठाने आया-बहिणींचा, स्त्रीत्वाचा अपमान होतो अशा अश्लाघ्य शिव्यांच्या वापरास, विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांमध्ये बंदीचे आदेश तातडीने निर्गमित करावेत असे "मास्वे" व शिव्यामुक्त समाज अभियान समिती तर्फे आम्ही आपणास आवाहन करित आहोत.**

**१९ ऑगस्ट ला रक्षाबंधन ( राखी पौर्णिमा ) च्या मुहूर्तावर** आपल्या विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यापीठाच्या अधिनस्त सर्व शिक्षण संस्थांमध्ये अशा शिव्यांचा वापरावर बंदीचा निर्णय जाहीर केल्यास तो खऱ्या अर्थाने छत्रपती शिवरायांना, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले,राजर्षी शाहू महाराज, महात्मा गांधी, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ पंजाबराव देशमुख आदी महापुरुषांना मानाचा मुजरा आणि आपल्या विद्यापीठ परिक्षेत्रातील तमाम लाडक्या माता-भगिनींचा सन्मान करणारी ओवाळणी ठरेल हे आपण कृपया लक्षात घेऊन आमच्या पुढील मागण्यांची पूर्तता करावी हि विनंती,

**आमच्या मागण्या –**

1. **विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालये व परिसर आदी सर्व ठिकाणी स्त्रीत्वाचा अपमान करणाऱ्या, स्त्रि- पुरुषांच्या जननेंद्रिये आणि इतर अश्लील शब्दांचा उल्लेख असणाऱ्या अश्लाघ्य शिव्यांच्या वापरावर बंदी घालण्यात यावी.**
2. **माता- भगिनींबद्दल अपशब्द वापरून एखाद्या पुरुषाला वा स्त्रीला मानसिक- भावनिक त्रास देणाऱ्या विद्यार्थी, शिक्षक- शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाच्या कारवाईची तरतूद करण्यात यावी,**
3. **विद्यापीठ प्रशासकीय व शैक्षणिक विभाग, सर्व संलग्नित महाविद्यालये आदी स्त्रीत्वाचा अपमान करणाऱ्या अपशब्दांच्या, अश्लाघ्य शिव्यांच्या वापरावर बंदी असल्याचे फलक दर्शनी भागात लावण्याचे निर्देश जारी करण्यात यावे.**
4. **विद्यापीठ शैक्षणिक विभाग व महाविद्यालयांमध्ये नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबवित असतांना जबाबदार नागरिक, नागरिकांची कर्तव्ये, इतरांचा आदर, लिंगभाव समानता, माता-भगिनींचा सन्मान आदी बाबींचा सर्व अभ्यासक्रमात समावेश करण्यात यावा.**
5. **विद्यापीठाच्या विविध विभाग विशेषतः राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास विभाग, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ आदीच्या माध्यमातून विद्यापीठ परिक्षेत्रात व्यापक जनजागृतीपर मोहीम राबविण्यात यावी.**
6. **विद्यापीठ शैक्षणिक विभाग व महाविद्यालयांमध्ये या विषयांवर चर्चासत्र, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा आदींचे आयोजन करण्याच्या सूचना निर्गमित करण्यात याव्यात.**
7. **अकॅडेमिक स्टाफ कॉलेज तर्फे राबविण्यात येणाऱ्या उद्बोधन वर्ग, उजळणी वर्ग आदी मध्ये शिव्यामुक्त समाज संदर्भात व्याख्यान, चर्चा आयोजित करावी.**

**सकारात्मक प्रतिसादाच्या अपेक्षेत,**

**आपला स्नेहांकित,**

**(प्रा डॉ अंबादास ये मोहिते)**
संस्थापक अध्यक्ष, "मास्वे" व
समन्वयक ,"शिव्यामुक्त समाज अभियान समिती"

**प्रत माहिती व उचित कार्यवाहीस्तव सविनय सादर –**
**मा. डॉ. विलास शिंदे**
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर,

---

**शिव्यामुक्त समाज अभियान समिती, द्वारा-प्रा अंबादास ये मोहिते, "साई-सुख", अप्रतिम कॉलनी, शासकीय मुलींच्या वसतीगृहाजवळ, जेल मेन गेट रोड, कॅम्प, अमरावती ४४४६०२, M-7972263323/9422190871 ई-मेल ambajyotimail@rediffmail.com,**

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

VC Office <vcoffice@unishivaji.ac.in>

# Re: अश्लाघ्य शिव्यांचा वापरावर विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांमध्ये बंदी आणण्याबाबत.....

2 messages

**Ambadas Mohite** <ambajyotimail@rediffmail.com> Wed, Aug 14, 2024 at 12:44 PM
To: vcoffice <vcoffice@unishivaji.ac.in>, registrar <registrar@unishivaji.ac.in>

मा. डॉ शिर्के सर,
आपणा सर्वांना "स्वातंत्र्य दिनाच्या" "हार्दिक शुभेच्छा!"

स्त्रीत्वाचा अवमान करणाऱ्या अश्लील शिव्यांच्या वापरावर विद्यापीठ व संलग्नीत महाविद्यालयांच्या परिसरात बंदीबाबत महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्स ("मास्वे") तर्फे आपणास दिनांक १७ जुलै रोजी पत्र पाठविले होते. आपण त्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही नक्कीच केली असणार हा विश्वास आहे.
आपण केलेल्या कार्यवाहीबाबत आम्हाला कळविल्यास आम्ही आपले आभारी राहू.
सहकार्याच्या अपेक्षेत,
आपला स्नेहांकित,
प्रा अंबादास ये मोहिते,
संस्थापक अध्यक्ष, "मास्वे",
संयोजक, शिव्यामुक्त समाज अभियान, महाराष्ट्र

From: "Ambadas Mohite"<ambajyotimail@rediffmail.com>
Sent: Wed, 17 Jul 2024 13:54:21 GMT+0530
To: "vcoffice"<vcoffice@unishivaji.ac.in>,"registrar"<registrar@unishivaji.ac.in>
Subject: अश्लाघ्य शिव्यांचा वापरावर विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांमध्ये बंदी आणण्याबाबत.....

Pls see attachment, Regards,

---

**Registrar Shivaji University, Kolhapur** <registrar@unishivaji.ac.in> Wed, Aug 14, 2024 at 12:45 PM
To: VC Office <vcoffice@unishivaji.ac.in>, Establishment Section <est@unishivaji.ac.in>, pvc office <pvcoffice@unishivaji.ac.in>

---------- Forwarded message ---------
From: **Ambadas Mohite** <ambajyotimail@rediffmail.com>
Date: Wed, Aug 14, 2024 at 12:44 PM
Subject: Re: अश्लाघ्य शिव्यांचा वापरावर विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांमध्ये बंदी आणण्याबाबत.....
To: vcoffice <vcoffice@unishivaji.ac.in>, registrar <registrar@unishivaji.ac.in>

मा. डॉ शिर्के सर,
आपणा सर्वांना "स्वातंत्र्य दिनाच्या" "हार्दिक शुभेच्छा!"

स्त्रीत्वाचा अवमान करणाऱ्या अश्लील शिव्यांच्या वापरावर विद्यापीठ व संलग्नीत महाविद्यालयांच्या परिसरात बंदीबाबत महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्स ("मास्वे") तर्फे आपणास दिनांक १७ जुलै रोजी पत्र पाठविले होते. आपण त्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही नक्कीच केली असणार हा विश्वास आहे.
आपण केलेल्या कार्यवाहीबाबत आम्हाला कळविल्यास आम्ही आपले आभारी राहू.
सहकार्याच्या अपेक्षेत,
आपला स्नेहांकित,
प्रा अंबादास ये मोहिते,

संस्थापक अध्यक्ष, "मास्वे",
संयोजक, शिव्यामुक्त समाज अभियान, महाराष्ट्र

From: "Ambadas Mohite"<ambajyotimail@rediffmail.com>
Sent: Wed, 17 Jul 2024 13:54:21 GMT+0530
To: "vcoffice"<vcoffice@unishivaji.ac.in>,"registrar"<registrar@unishivaji.ac.in>
Subject: अश्लाघ्य शिव्यांचा वापरावर विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांमध्ये बंदी आणण्याबाबत.....

Pls see attachment, Regards,

*This email and any files transmitted with it are confidential and intended solely for the use of the individual or entity to whom they are addressed. If you have received this email in error please notify the system manager. Please note that any views or opinions presented in this email are solely those of the author and do not necessarily represent those of the Shivaji University. Finally, the recipient should check this email and any attachments for the presence of viruses. Shivaji University accepts no liability for any damage caused by any virus transmitted by this email.*